माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ११०३/२०२२**

**अपिलार्थी, श्री. संपत नारायणराव खोब्रागडे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी,**
ता. पवनी, जि. भंडारा

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक(रो.ह.यो. व वन्यजीव),**
भंडारा, ता. जि. भंडारा

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०७.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २४.०१.२०२२ | निरंक | ०२.०३.२०२२ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये दिनांक २४.०१.२०२२ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अर्ज सादर केले असून त्यात त्यांनी " जानेवारी २०१९ ते ऑगस्ट २०२१ पावेतो, १) वनक्षेत्र पवनी मधील बिट गुडेगाव कं. नं. ३११ राखीव वनामध्ये अवैद्य उत्खनन करुन रेतीचा साठा करुन ठेवल्याने रेती २९ ब्रास जप्त करुन गुडेगाव वन नाक्यावर डुलाई केली असता, वाहतुक करण्याबाबत निवीदा (Cotation) मागविले होते काय? मागविले असल्यास झेराक्स प्रती तसेच मंजुर केलेल्या कोटेशनच्या झेराक्स प्रत, कोटेशन मागविले नसल्यास कोणाचे आदेशाने रेती डुलाई करण्यात आली व त्यासाठी किती रक्कम खर्च झाला त्याची माहिती देण्यात यावी " इत्यादी एकुण पाच मुद्यावर माहिती मागितलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०२.०३.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे " ३० दिवस पुर्ण होऊन माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी सुचना जारी केल्या मात्र प्रत्यक्षात सुनावणी घेतल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दिनांक २२.०४.२०२२ रोजी " ३० दिवस पुर्ण होऊन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणताही आदेश प्राप्त झाला नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक २३.०७.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, तत्कालीन जन माहिती अधिकारी स्तरावरुनच उपरोक्त ३५ पृष्ठाची माहिती ही सशुल्क प्रदान करण्यात आली होती. त्या विरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक ०२.०३.२०२२ रोजी प्रथम अपील अर्ज व दिनांक २२.०४.२०२२ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे. यात कुठलीच माहिती मिळाली नसल्याचा अपिलार्थी यांनी आक्षेप नोंदविला असला तरी, आज झालेल्या सुनावणीत विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, पवनी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २२.०२.२०२२ रोजीच ३५ पृष्ठाची सशुल्क माहिती पुरविली असल्याबाबत कार्यालयीन नोंद दाखविली आहे. अपिलार्थी आज हजर नसल्यामूळे त्यांची बाजू एकुण घेता आली नाही.

वरील वस्तुस्थितीचे अवलोकन केले असता, जोडपत्र अ च्या अनुषंगाने कार्यालयीन अभिलेखात कलम २(च) प्रमाणे उपलब्ध असलेली व देय असलेली माहिती याआधीच अपिलार्थी यांना प्रदान केली असल्यामुळे, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढुन नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २३.०७.२०२४**

जावक क्रमांक 7232 दिनांक 14 OCT 2024